2024-2025

ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

INTERLINK RESEARCH ANALYSIS

Editor In Chief
Dr. Balaji Kamble

Scanned with OKEN Scanner

RNI. MAHMUL02805/2010/33461

IMPACT FACTOR 6.50

ISSN 0976-0377

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

INTERLINK RESEARCH ANALYSIS

डॉ. ज्ञानानंद कुबडे

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XXIX, Vol. II
Year - 15 (Half Yearly)
(Jan. 2024 To June 2024)

Editorial Office :
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Contact : 8484818000
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

Website
www.irasg.com

E-mail :
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

Publisher :
Jyotichandra Publication,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

Price: ₹ 200/-

CHIEF EDITOR

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

EXECUTIVE EDITORS

Dr. Aloka Parasher Sen
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

Dr. Laxman Satya
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

Dr. Huen Yen
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

Dr. Sadanand H. Gone
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

Dr. G.V. Menkudale
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

Dr. Balaji S. Bhure
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

DEPUTY-EDITORS

Dr. S.D. Sindkhedkar
Vice Principal
PSGVP's Mandals College,
Shahada, Dist. Nandurbar (M.S.)

Veera Prasad
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

Dr. C.J. Kadam
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

Johrabhai B. Patel,
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

CO-EDITORS

Sandipan K. Gaike
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

Dr. Shivaji Vaidya
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

Ambuja N. Malkhedkar
Dept. of Hindi
Gulbarga, Dist. Gulbarga,
(Karnataka State)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

Scanned with OKEN Scanner

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.50
ISSN 0976-0377
Issue:XXIX,Vol.II. Jan. 2024 To June 2024

INDEX

Sr. No	Title for Research Paper	Page No
1	Nodal anatomy of two Lantana species in Verbenaceae **Poonam A. Tandale**	1
2	Credit Co-operatives and Financial Sector Reforms **Avinash Dinkar Munde**	6
3	Regulation of Stress and Mental Health **Deepali T. Deshmukh**	10
4	A Critical Study of Up From Slavery as Booker T. Washington's Journey from a Slave to Successful Educator and Orator **Dr. Vinod Sidram Sonwane**	14
5	Effect of Dimethoate on The Biochemical Composition In The Gill of Freshwater Fish Rasbora Daniconius **Dr. Shesherao S. Parwe**	20
6	नासिरा शर्माकृत 'कुइयाँजान'उपन्यास में जल, जंगल एवं जमिन का संकट **डॉ. शिवाजी शेषेराव कदम**	29
7	जीवन की सार्थकता का बयान गृहप्रवेश कहानी **डॉ. छाया जी. कडेकर**	35
8	कृषी विकासातील कृषी पर्यटनाची भूमिका **डॉ. सुदर्शन व्यंकटराव सोनवणे**	41
9	वाढती लोकसंख्या आणि आर्थिक विकास **डॉ. गजानन संतोषराव कुवडे**	46
10	दलित मराठी वाङमयीन नियतकालीकांचे साहित्यप्रकारात योगदान **डॉ. रामहरी मधुकर सुर्यवंशी**	53
11	मराठा मोर्चा : महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम **डॉ. विनोद धोंडिराम आचार्य**	58

Scanned with OKEN Scanner

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.50 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XXIX, Vol. II, Jan. 2024 To June 2024 46

वाढती लोकसंख्या आणि आर्थिक विकास

डॉ. गजानन संतोषराव कुबडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, वाशिम, जि. वाशिम

9 **Research Paper - Economics**

आज भारतीय अर्थव्यवस्थे समोरील महत्वाचा एखादा प्रश्न असेल तर तो आहे वाढती लोकसंख्या होय. कारण वाढती लोकसंख्या ही आर्थीक विकासाला मारक ठरत आहे कुठल्याही देशाचा आर्थीक विकास हा त्या देशात उपलबध असलेल्या नैसर्गिक साधन संपत्ती व लोकसंख्या हया दोन घटकावर अवलंबुन असतो नैसगिक साधन संपत्ती ही त्या देशाला मिळालेली नैसर्गिक देन आहे तिचा जपुन वापर करणे गरजेचे असते त्याच बरोबर लोकसंख्या ही देखील एक संपत्ती आहे. परंतु ती जर अर्थव्यवस्थेला पेलणारी नसेल तर ती डोकेदुखी ठरु शकते कारण वाढलेला आर्थीक विकास हा वाढणारी लोकसंख्या गिळंकृत करते म्हणुन वाढती लोकसंख्या देशाला मारक ठरते.

काही तज्ञान्याच्या मते असे म्हटले जाते की आज पासुन जवळपास २० ते ३० लाख वर्षापुर्वी या पृथ्वीवर मानवाचे अस्तीत्व नव्हते. सन १८३० मध्ये जगाची लोकसंख्या केवळ १ अब्ज होती तर १९३० पर्यंत ती २ अब्ज पर्यंत वाढली १९६० पर्यंत ती ३ अब्ज झाली पुढे १९७५ मध्ये ती ४ अब्ज झाली ११ जुलै १९८७ ला जगाची लोकसंख्याही ५ अब्ज झाली आणि हया वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी खबरदारी म्हणुन ११ जुलै हा दिवस दरवर्षी जागतिक लोकसंख्या दिवस म्हणुन पाळावयास सुरुवात झाली १२ ऑक्टोबर १९९१ ला ही लोकसंख्या ६ अब्जापर्यंत वाढली आज जगाची लोकसंख्या ही ७ अब्जाच्याही पुढे गेली आहे.

भारतीय लोकसंख्येचा वाढीचा आलेख पाहिला तर हा देखील वाढताच दिसतो. इ.स. १६०० मध्ये भारताची लोकसंख्याही १० कोटी होती. सन १८०० मध्ये ती १२ कोटी पर्यत वाढली १८५० मध्ये ती १५ कोटी झाली तर १८६१ मध्ये ती १६.४० कोटी पर्यंत वाढ झाली. सन १८६७ मध्ये ती १९.४० कोटी झाली १९०१ मध्ये २३.८३ कोटी इतकी बाढ झाली. १९११ मध्ये २५.२० कोटी झाली सन १९२१ मध्ये लोकसंख्या २५.१२ कोटी झाली हया वर्षा पर्यत लोकसंख्या वाढीचा दर अत्यंत कमी होता तर १९२१ मध्ये तो दर ३ ने (-) झाला त्यांनतर मात्र हा दर वेगाने वाढु लागला म्हणुन १९२१ हे वर्ष महाविभाजनाचे वर्ष म्हणुन संबोधले जाते १९५१ ला लोकसंख्या ही ३६.१० कोटी झाली लोकसंख्या

Scanned with OKEN Scanner

वाढीचा दर हा १.२६ हा होता १९६१ ला लोकसंख्या वाढीचा दर हा १.९८ टक्के पर्यंत झाला. १९७१ च्या जनगननेमध्ये ही लोकसंख्या ५४.८२ कोटी झाली व लोकसंख्या वाढ ही २.२० टक्के होती १९८१ मध्ये लोकसंख्या ही ६८.३३ कोटी होती तर १९९१ मध्ये ८४.६४ कोटी पर्यंत होती दर हा २.३५ इ ाला २००१ मध्ये लोकसंख्येत वाढ होवुन ती १०२.८७ कोटी झाली. तर दहा वर्षातील लोकसंख्या वाढीचा दर हा २.३५ झाला २००१ मध्ये लोकसंख्या १०२.८७ कोटी झाली तेव्हा लोकंसख्या वृध्दी दर १.९५ हा होता तर २०११ मध्ये लोकसंख्या १२१.०२ कोटी पर्यंत वाढ झाली तर सध्या ही लोकसंख्या १२५ कोटीच्याही पुढे गेली आहे ही वाढती लोकसंख्या देशाच्या विकासात अडसर ठरणारी दिसते काही अर्थशास्त्राच्या मते वाढत्या लोकसंख्येला आळा घातला तरच विकास संभव आहे. परंतु जर आपण वाढत्या लोकसंख्येकडे सकारात्मक बाजुने पाहिले तर विकास शक्य आहे. प्रसिध्द अर्थशास्त्र एडविड कैनन यांच्या मतानुसार ''जो मानव जन्म घेतो तो त्याच्या तोंड आणि पोठाबरोबरच दोन हात देखील घेऊन जन्मास येतो की ज्यामुळे आर्थीक श्रमशक्ती चा वापर करुन कृषी आणि उोग क्षेत्रात उत्पादकता वाढवता येईल'' हे भारतीय अर्थव्यवथेत शक्य आहे.

वाढती लोकसंख्या आर्थिक विकासामध्ये कश्याप्रकारे योगदान देते हे आपणास पुढील विवेचनावरुन समजुन येईल.

वाढती लोकसंख्याही श्रमाच्या पुरवठा करीत असते आर्थिक विकासामध्ये ज्याप्रमाणे नैसर्गिक साधन संपत्ती, भांडवल, तंत्रज्ञाना बरोबरच श्रम हा घटक सुध्दा तेवढाच महत्वपुर्ण आहे हया बाबत अर्थतज्ञ साईमन कुजनेट यांचे प्रतिपादन अत्यंत महत्वाचे मानले जाते त्याचे म्हणने असे की, ''इतर परिस्थीती स्थिर असता वाढत्या लोकसंख्येच्या प्रत्येक वाढीबरोबर प्रत्येक श्रमशक्तीची वाढ होत असते. '' त्याच बरोबर श्रम शक्ती वाढण्यामध्ये घटते मृत्यु प्रमाण व परदेशी श्रमीकांचे स्थलांतरण व जन्मदराने वाढते प्रमाण यामुळे श्रमशक्ती मध्ये वाढ होते तर अशाप्रकारे वाढत्या श्रमशक्तीमध्ये वाढीस वाढती जनसंख्या ही कारणीभुत ठरते. आणि ही वृध्दी आर्थिक विकासाला पुरक ठरते व त्यामुळे उत्पादन वाढ होते.

बाजार पेठाचा विस्तार व विकास होण्यासाठी वाढती लोकसंख्या ही फायदयाची ठरते की ज्यामुळे बाजारपेठाचा विकास व विस्तार होते व त्यामुळे मागणी मध्ये वाढ होते उत्पादनात वाढ व रोजगारात वाढ व त्याच बरोबर उत्पन्नात वाढ होते अशा प्रकारे वाढती लोकसंख्या ही बाजाराच्या विस्तार व आर्थिक विकासाला चालना देते.

उत्पादनामध्ये वाढकरण्यामध्ये वाढत्या लोकसंख्येचा हातभार हा मोठा आहे वाढत्या लोकसंख्येमुळे देशात श्रमशक्ती व श्रमाच्या विशिष्ठकरणामध्ये वाढ होते व उत्पादनात वाढ होते डॉ. ब्राइटसिंह यांच्या मते ''लोकसंख्या वाढ ही श्रमाचे विभाजन व विस्तृतीकरण व वैशिष्टीकरणाला जन्म घालते व त्यामुळे बचत तंत्रज्ञान व संघटन कौशल्य वाढीस लागते.'' परंतु उत्पादनामध्ये वाढ होण्यासाठी

Scanned with OKEN Scanner

लोकसंख्याचा आकार हा देशातील उपलब्ध असलेल्या भांडवल व भुमिच्या तुलनेमध्ये कमी असणे गरजेचे आहे.

मानवी भांडवल निर्माण करण्यामध्ये वाढती लोकसंख्या ही आधारभुत ठरत असते की उलब्ध असलेल्या अतिरिक्त श्रमशक्तीचा वापर करुन मानवी भांडवलाची निर्मिती करण्याचे एक साधन म्हणुन गणले जाते रैगनर नर्क्स च्या मते अतिरिक्त श्रमाची शक्ती ही एक अदृश्य बचत असते आणि अर्ध- बेरोजगारी मध्ये ही बचत उपयोगात येऊन भांडवल निर्माण करण्यास साहयभुत ठरते व त्याचा उपयोग केला जाऊ शकतो.

जेव्हा देशामध्ये उपलब्ध असलेलया जनशक्ती मध्ये ज्ञानाची वाढ होते तेव्हा त्यांच्या कार्यामध्ये कुशलता व योग्यता निर्माण होते आणि त्या द्वारे मानवी भांडवलाची निर्मिती होते व ज्यामुळे देशात दरडोई उत्पादकता वाढू शकते व देशआर्थिक विकासात प्रगती करतो डॉ. कौन्ड्रीक असे म्हणतात की श्रमाच्या उत्पादकतेमध्य वाढ व औद्योगीक अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासामध्ये वाढ करण्यामागे श्रम शक्तीचा मोठा वाटा आहे. जो की आपण अमेरीका व जपान सारख्या झपाटयाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेकडे पाहिले तर आपणास दिसुन येत आहे की या देशाच्या आर्थिक विकासात श्रमशक्तीचा मोठा हातभार आहे. नवनवीन संशोधन व तंत्रज्ञानाचा जो शोध लावला गेला आहे तो मानवाच्याद्वारेच लागला गेला आहे आणि हा संशोधक मनवाचा पुरवठा हा वाढत्या लोकसंख्येद्वारे उपलब्ध होतो मानव बुध्दीचा वापर करुन तो आज समुद्रापासुन तर आंतराळापर्यंत जाण्याचे नवनवीन शोध व वैज्ञानिकाची देय व ज्ञानाचे भांडार निर्माण करण्याची देण ही सुध्दा मानवाच्या प्रगतीमुळे मिळालेली आहे. आज आपणास सर्वभौतिक सुविधा केवळ मानवाच्या प्रगतीमुळे मिळु लागल्या आहेत त्यात केवळ मनुष्य बळाचा जास्त प्रमाणात वाटा आहे आणि तो आपणास श्रमापासुन मिळतो.

.भारतात वाढती लोकसंख्या इतर देशाच्या तुलनेमध्ये ज़ास्त वेगाने वाढली आहे. तर ती वाढण्याची कारणे कोणती आहेत याचे विवेचन करणे आपणास आवश्यक आहे. भारताची लोकसंख्या जलदगतीने वाढण्याची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे संगता येतील.

भारतामध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे विशेषत : महिला निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. स्वातंत्र्यपुर्व काळात भारतात निरक्षरता अधिक होती स्वातंत्र्यानंतर साक्षरतेमध्ये वाढ झालेली दिसते.ज्या व्यक्तीला लिहीता आणि समजुन वाचता येत असेल तर तिला साक्षर समजले जाते ज्या व्यक्तीला फक्त वाचता येत असेल पण लिहीता येत नसेल तर तिला निरक्षर समजले जाते १९५१,१९६१ व १९७१ या काळातील साक्षरता प्रमाण विचारात घेताना ५ वर्षावरील बालाकांचा यात समावेश केला जात असे परंतु १९८१,१९९१, व २००१ च्या जनगणनेनुसार ७ वर्षावरील व्यक्तीची साक्षरतेसाठी गणना करण्यात आली. भारतात साक्षरतेचे प्रमाण सर्व घटक राज्यात सारखे नाही केरळ सारख्या राज्यात साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे तर बिहार सारख्या राज्यात निरक्षरता जास्त

Scanned with OKEN Scanner

आहे त्यामुळे जनसामान्यात जाणीव निर्माण होत नसल्याने लोकसंख्या वाढीला चालना मिळते.

भारतात सार्वत्रिक विवाहाची प्रथा आहे शिवाय हे विवाह लहानवयात होतात त्यामुळे पती-पत्नीला एकत्र साहचर्य्याला मोठा कालावधी मिळतो. प्रजोत्पादनाच्या दृष्टीने मोठा कालावधी उपलब्ध झाल्याने लोकसंख्या जलद गतीने वाढते. जगाच्या तुलनेत भारतात अल्पवयात विवाह होतात १९२९ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा संमत झाला असला तरीही विवाह कमी वयात होतात भारतात विवाहाची वयोमर्यादा मुलांच्या बाबतीत २१ वर्ष व मुलींच्या बाबतीत १८ अशी जरी असली तरीही हिंदु धर्मातील पददलीत जातीतील व आदिवाशी जाती जमातीतील आजुनही अल्पवयीन विवाहाचे प्रमाण अधिक आहे.

भारतात गरीबीचे प्रमाण अधिक आहे. आजही भारतातील जवळपास ३७ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखालील जीवन जगतात भारताततील प्रजननाचा दर अधिक असल्यामुळे मुलांची संख्या अधिक आहे. जास्त मुले असलील तर जास्तीचा रोजगार उपलब्ध होईल व शेतीमध्ये कामधंदयास उपयोगी पडतील व चार पैसे मिळवतील आणि वृध्दापकाळामध्ये आधार मिळेल अशा हेतुमुळे मुलांना अधिक जन्माला घातले जाते व त्यामुळे लोकसंख्या वेगाने वाढते.

भारतात धर्माचा पगडा व समाजात चुकीच्या गैरसमजुती यामुळे 'मुले ही देवाची देणगी आहे' असे समजले जाते. त्यामुळे कुटुंब नियोजनाचा मार्ग आवलंबीत नाहीत. देव, धर्म, रुढी अंधश्रध्दा, परंपरा याचा मोठा पगडा आहे. भारतात पितृप्रधान समाजव्यवस्था असल्याने मुलगा जन्माला आला तरच आपल्या घराण्याचे नाव पुढे चालु राहिल अरो मानले जाते त्यामुळे एखादया व्यक्तीला कितीही मुली असल्या तरी घराण्याचे नाव पुढे चालु राहावे या हेतुने मुलाच्या अपेक्षेने प्रयत्न केले जातात. त्यामुळे लोकसंख्या वाढते.

सन १९६० पर्यंत भारतात जन्मदरापेक्षा मृत्युदर मोठा होता त्यामुळे लोकसंख्या ही वेगाने वाढली नाही. त्यानंतरच्या काळातही उच्च जन्मदर हे भारतीय लोकसंख्यावाढीचे प्रमुख कारण आहे. सन २०१६ मध्ये दरहजारी साधारण १९ बालके जन्माला येतात तर साधारणपणे ७ ते ८ बालके मृत्युमुखी पडतात. त्यामुळे दरसाल दरहजारी १० ते १२ लोकांची एकुण लोकसंख्येत भर पडते. सन २०११ च्या जनगननेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी पेक्षाही अधिक झाली. भारतातील लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर १७६ टक्के तर जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या चीन मध्ये लोकसंख्या वाढीचा वार्षिक वृध्दीदर १ टक्के आहे याचा अर्थ काही वर्षातच भारताची लोकसंख्या चीनपेक्षा अधिक होईल.

बालमृत्युच्या प्रमाणामध्ये घट होत असल्यामुळेच लोकसंख्या वाढीला वेग येत आहे. भारतात १९१६ ते १९२० या काळात बालमृत्युचे प्रमाण दरहजारी २१८ इतके होते ते १९८९ मध्ये शहरी भागात दरहजारी ५८ पर्यंत घटले तर ग्रामीण भागात ते ९८ झाले आहे. देशात ते १९९७ मध्ये सरासरी ७१

Scanned with OKEN Scanner

होते निकृष्ट आहार साथीचे आजार इत्यादीमुळे बालमृत्युचे प्रमाण अधिक राहीले. २०१६ मध्ये ०-५ वर्ष या वयोगटातील १००० मुलामागे बालमृत्युचे प्रमाण ५४.४६ होते. त्यामुळे अधिक बालकांचा जन्म घातला जाई आलीकडे आरोग्य विषयक सोईमध्ये वाढ होत गेल्यामुळे बालमृत्युचे प्रमाण कमी होत गेले आणि त्यातुन लोकसंख्या वाढीला चालना मिळत गेली.

वाढत्या लोकसंख्येची समस्या सोडवण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजना

स्वातंत्र्यानंतर वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण हा कार्यक्रम राववण्यात आला परंतु त्यांची प्रत्यक्षात अमलबजावणी होवु शकली नाही. त्यामुळे आज आपल्या देशात एवढी प्रचंड लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी शासनामार्फत विविध योजना अमलात आणल्या गेल्या परंतु त्यांची तळागळापर्यंत माहिती पोहचली नाही ही वास्तविकता आहे. त्यामुळेच वाढत्या लोकसंख्येची धौडदौड सुरुच आहे.

भारतीय समाज अज्ञानी व अशिक्षीत असल्यामुळे तो कुठल्याही जातीचा अगर धर्माचा असला तरी लोकसंख्या वाढीस जबाबदार ठरतो. त्यामुळे देशात प्रत्येक वर्षी जवळपास १ कोटी लोकसख्यंची भर पडत आहे. तर या वाढत्या लोकसंख्येला नियंत्रण ठेवण्यासाठी रेडीओ, टि.व्ही. वर्तमानपत्र व सामाजिक संस्था यांचा निश्चितच उपयोग होऊ शकतो. आज बऱ्याच प्रमाणावर समाजात जागरुकता आली आहे. मागील काही वर्षापेक्षा आज जन्मदर काही प्रमाणात घटला आहे. परंतु आजुनही जन्मदाराचे प्रमाण घटवणे आवश्यक आहे. यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी वाढत्या लोकसंख्येला रोजगार शिक्षण व त्या अनुषंगाने इतर संसाधनाची पुर्तता करणे गरजेचे आहे. त्यातुन समाजात जागृती निर्माण होऊ शकेल.

आपल्याच देशात जवळपास ३७ टक्के च्या वर लोक गरीबी रेषेच्या खाली जीवन जगत आहेत. हया पैकी अनेक लोक अशिक्षीत व अज्ञानी आहेत त्यामुळे अश्या परिस्थीतीत देशात जनिव जागृती व चर्चा, परीसंवाद, विविध प्रयोग राबवुन देशातील जनतेमध्ये माहिती दयावी व त्याचबरोबर कुटुंब नियोजन कार्यक्रम राबवताना लोकामध्ये गर्भनिरोधक साधनाचा वापर करावा हया बदल माहिती दयावी. वरील प्रकारच्या कार्यक्रम राववला आहे अशा प्रकारची शासनाची आकडेवारी असते परंतु प्रत्यक्षात ही माहिती कागदावर राहते प्रत्यक्षात त्याची अमलबजावणी होत नाही.

आजही भारतीय समाजामध्ये रितरिवाज व परंपरा यांचे पालन केले जाते ग्रामीण जीवन तर अधिकच अंध:श्रध्दा पाळतो मुले ही देवाघरची फुले अशी धारणा आहे जितके घरात मुले जास्त तितकी कामे करणारी माणसे जास्त व घरचा आधार म्हणुन त्यांच्याकडे पाहिजे जाते. वृध्दापकाळी काठीला आधार अशाप्रकारची माणसिकता समाजात रुढ झाली आहे. आज विज्ञानाचे युग असुन देखील पुराणी टाकावु रुढी सोडवण्यास मानव तयार नाही जर सरकारने सामाजिक सुरक्षा, शिक्षण, आरोग्य उपलब्ध करुन दिली तर लोकसंख्या नियंत्रणाबरोबरच गरीबी, बेकारी, आरोग्य व अशिक्षीतपणा दुर

Scanned with OKEN Scanner

होईल अशा योजनाचा लाभ त्याच लोकांना मिळावा की जे लोकसंख्या नियंत्रण आणि साक्षरता वाढीसाठी व सरकारी निती नियमांचे पालन करीत आहेत. की ज्याद्वारे घरकुल योजना कमी दराने कर्जपुरवठा अशा सुविधा उपलब्ध करुन देता येतील.

भारतातील महिलाशक्ती ही एक महत्त्वाचा उत्पादक घटक आहे त्याचा वापर होणे गरजेचे आहे त्यासाठी महिला सबलीकरणासारखे प्रोग्राम राबवणे आवश्यक आहे. की ज्यामुळे लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठी मदत होऊ शकेल. त्यासाठी महिला शिक्षित व आर्थिक दृष्टया सक्षम आणि आत्मनिर्भर होणे गरजचे आहे. सामाजिक दृष्टया महिला हया पुरुषांच्या बरोबर आल्या पाहिजेत त्यांना त्यांचा अधिकार मिळाला पाहिजे. राजकीय क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात व आर्थिक क्षेत्रात हया पुढे आल्या पाहिजेत. त्याच बरोबर शारीरीक दृष्टया देखील त्या सक्षम बनल्या पाहिजेत. परंतु हयाबाबतीत महिलांना स्वत:चा निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत. त्यामुळे भारतात लोक संख्या नियंत्रणाचा कार्यक्रम सफल होत नाही. पाश्चात्य राष्ट्रात महिलांच्या सामाजिक, कार्यामध्ये सहभाग असतो त्यामुळे कुंटुंब नियोजनासारखी कार्यही सफल होतात. त्यामुळे महिलासवलीकरण होणे गरजेचे आहे.

लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रमाची यशस्वीताही त्या राष्ट्रातील विवाह योग्य वयावर अवलंबुन आहे मुलांचे लग्न २१ वर्षानंतर व मुलीचे लग्न १८ वर्षानंतरच झाले पाहिजे. परंतु भारतात अल्पवयातच लग्न होत असल्यामुळे लोकसंख्येत वेगाने वाढ होत आहे. त्याच बरोबर अल्पवयात मुले होत असल्याने बाल कुपोषण व माता कुपोषनाची शक्यता असते. भारतात लग्न करण्याचे सरासरी वय १९ वर्ष आहे तर पाश्चात्य राष्ट्रात हेच वय ३२ वर्ष आहे. त्यामुळे पाश्चात्य राष्ट्राच्या तुलनेत भारतातील लोकसंख्या वाढीचा वेग अधिक आहे. मुलीच्या शिक्षणावर अधिकाधिक लक्ष केंद्रीत होणे गरजेचे आहे. कारण त्यामुळे माता शिक्षीत होतील आणि त्यामुळे त्याची मुले शिक्षीत व आरोग्य दृष्टया सुदृढ बनतील व त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण होऊन कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला प्रोत्साहन मिळेल व त्यामुळे जास्त मुले जन्मास येणार नाहीत. विश्वासातील आकडेवारी जर पाहिली तर आपल्या निदर्शनास येते की ज्या राष्ट्रातील महिला हया शिक्षीत आहेत त्या राष्ट्रातील लोकसंख्या वाढीचे प्रमाण कमी आहे. भारतातील मुलीच्या शिक्षणाच्या उदासिनतेमुळे लोकसंख्या वाढीस योगदान मिळाले आहे. अशिक्षीत महिलांना फारसी समज नसल्यामुळे जास्त मुले जन्मास आली तर त्यांचे अर्थव्यवस्थेवर काय परीणाम होतील याची जाणीव निर्माण होत नाही. काय चांगले आहे किंवा काय वाईट आहे यांची जाणीव निरक्षर महिलांना असत नाही त्याच बरोबर ग्रामीण भागात मनोरंजनाची फारसी साधने उपलब्ध नसल्याने जास्तीचे मुले जन्मास येतात व त्यातुन लोकसंख्या वाढते. हयासाठी मुलींचे शिक्षण महत्वाचे आहे.

जोपर्यंत देशातील गरीबी, बिमारी, बेरोजगारी आणि सामाजिक असुरक्षा हया दुर करण्याच्या

Scanned with OKEN Scanner

विकास कार्यक्रमाची आखणी होत नाही तोपर्यंत लोकसंख्या नियंत्रणात येणार नाही. देशातील राजकीय, धार्मिक, औद्योगिक, सांस्कृतिक हया क्षेत्रामधुन जोपर्यंत लोकसंख्या नियंत्रण करण्याच्या योजनाची अमलबजावणी होत नाही तोपर्यंत लोकसंख्या नियंत्रणात येणार नाही. भारतात लोकसंख्या नियंत्रासाठी दोन पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. एक म्हणजे कुटुंबनियोजन कार्यक्रम राबवुन तर दुसरा सामाजिक व आर्थिक कार्यक्रमाच्या माध्यमातुन मानवी समाजास चांगल्या सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात की जेणे करुन देशाचा आर्थिक विकासाचा स्तर वाढेल व समाजात जाणीव जागृती निर्माण होईल देशातील बहुतांश अर्थतज्ञाचे असे मत आहे की, वरील दोन्ही उपाय योजना हया एकमेकास पुरक आहेत. त्यामुळे दोन्ही पैकी कुठलीही एक योजना कार्यक्रम कमी केला तर दुसरी योजना सफल होत नाही.

सारांश

लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रम राबवताना सरकारच्या ज्या योजना व कार्यक्रम आहेत योग्य पध्दतीने राबवल्या पाहिजेत आणि त्या राबवताना जनसामान्याच्या झाल्या पाहिजेत प्रत्येकाला वाटले पाहिजे हा आपला कार्यक्रम आहे. परंतु बहुतांश लोकाची अशी विचारसरणी असते की अशा कार्यक्रमाचे आणि आपले काही देणे घेणे नाही असे वागतात. परंतु असा विचार बदलणे गरजेचे आहे. आज भारताला आवश्यकता आहे की, वाढती लोकसंख्या स्थिर ठेवणे किंवा नियंत्रणामध्ये आणणे हयासाठी देशात जाणीव जागृती निर्माण करणे व ती गावा गावा पर्यंत पोहचती करणे व ती शेवटच्या घटकापर्यंत तो विचार गेला पाहिजे हया कार्यक्रमात महिला, पुरुष व गरीब, श्रीमंत हया सर्वस्तरापर्यंत माहीती पोहचली पाहिजे त्यासाठी देशामध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे विकेंद्रीकरण होईल व सर्व लोकांना हा कार्यक्रम आपला आहे अशी भावना वाढीस लागेल. सरकारी कायदे व नियम कितीही निर्माण केले तरी त्या कार्यक्रमास उत्तेजन तेव्हाच मिळेल की जेव्हा सर्व स्तरातुन अशा कार्यक्रमास प्रोत्साहन व हा कार्यकम स्वत:चा आहे अशी भावना बनेल.

संदर्भ सूची :-

१) भारतीय अर्थव्यवस्था - प्रा.एन.एल. चव्हाण
२) भारतीय अर्थव्यवस्था- भोसले काटे
३) प्रतियोगिता दर्पण - मासिक ऑक्टोबर २०१६
४) योजना मासिक डिसेंबर २००४
५) भारतीय अर्थशास्त्र - देव झामरे

Scanned with OKEN Scanner